**गोपनीय/अतितात्काळ**

क्र. पोमसं/२/१०२०/निनिसू-२०१७-१८/२१०/२०१७.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- ०१/११/२०१८.

**संदर्भ** :- शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-०११७/प्र. क्र. २५८/पोल-१ अ, दिनांक ३१/१०/२०१८ (प्रत सलग्न)

**विषय** :- पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नतीने पदस्थापना..

* * * * *

पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त(नि:शस्त्र) पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१७-१८ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या खालील नमूद पोलीस निरीक्षकांना पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त(नि:शस्त्र) पदावर (वेतनश्रेणी रू. १५,६००-३९,१००+ग्रेड पे ५४००/-) निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत असून, त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदोन्नतीवर पदस्थापनेबाबत संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पो.नि. पदातील सध्याची नेमणूक | पदोन्नतीवरील नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री. नितीन सदाशिवराव भोसले-पाटील | पुणे शहर | सहायक पोलीस आयुक्त, अमरावती शहर |
| २. | श्री. विद्यानंद मुरलीधर काळे | जालना | उपविभागीय पोलीस अधिकारी, दर्यापूर उपविभाग, अमरावती ग्रा. |
| ३. | श्री. श्रीपाद बाळकृष्ण काळे | बृहन्मुंबई | पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), अकोला |

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

**अ.** उपरोक्त शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी, व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास पाठवावा.

**आ.** पदोन्नती प्राप्त पोलीस निरीक्षकांच्या नावांसमोरील नमूद सध्याच्या नियुक्ती ठिकाणी काही बदल झालेला असेल तरी सदर अधिकारी सध्या ज्या ठिकाणी कार्यरत असेल त्या घटकप्रमुखांनी अशा पोलीस निरीक्षकास त्यांच्या नावासमोरील नमूद पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्याही प्रतिक्षेविना तात्काळ कार्यमुक्त करावे.

**इ.** पदोन्नती आदेशाधिन अधिकाऱ्यास नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करून, कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाल्याची तारीख संबंधीत घटक प्रमुखांनी तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, प्रस्तुत अधिका-यांविरूध्द गुन्हा दाखल झाला असेल किंवा खात्यांतर्गत शिक्षेचे आदेश निर्गमित झाले असतील, किंवा कोणाही अधिका-यास निलंबित केले असल्यास तसेच, सदर अधिकारी वेतनवाढ रोखण्याची शिक्षा भोगत असल्यास, संबंधीत घटक प्रमुखांनी

त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ कळवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी. पदोन्नतीवरील अधिकारी जर नेमणुकीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरूद्ध या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक १६.०९.१९८३, ११.०१.१९८४ व १०.०२.१९९१ तसेच क्र. पोमसं /३/५५०७/६/९७, दिनांक १३.०२.१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

ई. उपरोक्त अधिकाऱ्यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकिनंतर जर त्यांच्याविरूध्दच्या प्रलंबित / प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने शिक्षा झाल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, पदोन्नती संदर्भात पुढील कार्यवाही करावी व तसे या कार्यालयास तात्काळ कळवावे.

उ. उपरोक्त पदोन्नती, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहुन करण्यात येत आहे.

ऊ. सदर तद्‌र्थ पदोन्नती निव्वळ तात्पुरती स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी उपरोक्त अधिकाऱ्यास नियमितपणा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

ए. उपरोक्त आदेशांतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकांच्या प्रथम पृष्ठांच्या प्रती व पदभार हस्तांतरण प्रमाणपत्राच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

ऐ. काही घटकांमध्ये निवडणूक आचारसंहिता चालू असेल त्या घटक प्रमुखांनी निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर त्यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांना पदोन्नतीवरील नियुक्ती ठिकाणी कार्यमुक्त करावे.

ओ. ज्या ठिकाणाबाबत कोणत्याही न्यायालयाचे काही विशिष्ट आदेश असतील परंतु त्याठिकाणी सदर आदेशान्वये पदस्थापना झाली असेल तर अशा न्यायालयीन आदेशाची अवमान्यता होणार नाही याचीही दक्षता घेण्यात यावी.

**(राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचे करिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
पोलीस आयुक्त, पुणे शहर / अमरावती शहर
पोलीस अधीक्षक, जालना / अमरावती ग्रामीण / अकोला

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२
(**लक्षवेध :- श्री. अ.अ.खोचरे,** कक्ष अधिकारी, पोल १अ)
महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.

प्रत :-

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (सस्नेह)
संबधीत जिल्हा कोषागार अधिकारी
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३, ९, ११, १४अ, ३२, ३६, ४०
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. सदरचे आदेश www.mahapolice.gov.in या वेबसाईटवर पोलीस निरीक्षक ते पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना या शिर्षाखाली पुढील ३० दिवसासांठी प्रसिध्द करण्यात यावेत.

<u>निवडसूची सन २०१७-१८.</u>
पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना....

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
शासन आदेश क्र.रापोसे-०११७/प्र.क्र.२५८/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :-३१ ऑक्टोबर, २०१८.

<u>शासन आदेश</u> :-

"पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र)" या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१७-१८ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या "नि:शस्त्र पोलीस निरीक्षक" या संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना "पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र)" या संवर्गातील पदावर (वेतनश्रेणी रु. १५,६००-३९,१००+ग्रेड पे ५४००/-) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून, त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. नितिन सदाशिवराव भोसले-पाटील | पोलीस निरीक्षक, पुणे शहर | सहायक पोलीस आयुक्त, अमरावती शहर |
| २ | श्री. विद्यानंद मुरलीधर काळे | पोलीस निरीक्षक, जालना | उपविभागीय पोलीस अधिकारी, दर्यापूर उपविभाग, अमरावती ग्रामीण |
| ३ | श्री. श्रीपाद बाळकृष्ण काळे | पोलीस निरीक्षक, बृहन्मुंबई | पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), अकोला |

२. उपरोक्त पदोन्नती, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

३. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरती स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी उपरोक्त अधिकाऱ्यांना नियमितपणा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

४. पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश असल्यास तसेच निवडणूक आचारसंहिता असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यांस पदस्थापना देण्यात यावी.

५. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांस, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८१०३११५२९०४८४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.10.31 15:36:24 +05'30'

**(कैलास गायकवाड)**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रति,**

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत :-**

१. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. पोलीस आयुक्त, पुणे/बृहन्मुंबई,
८. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र,
९. पोलीस अधीक्षक, अमरावती/अकोला/जालना,
१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/अमरावती/अकोला/जालना,
१३. सर्व संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत),
१४. निवडनस्ती पोल-१अ